शनिवार दि.१४ सप्टेंबर२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : १३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# राहुल गांधींनी माफी मागावी,अन्यथा भाजप स्वस्थ बसणार नाही:भाजप नेते चंद्रकांत पाटील यांचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

आरक्षण रद्द करण्याबाबत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्याबद्दल त्यांनी देशाची आणि देशातील दलित समाजाची माफी मागावी, त्याशिवाय भारतीय जनता पार्टी स्वस्थ बसणार नाही, असा इशारा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिला.

राहुल गांधी यांनी केलेल्या आरक्षण विरोधी वक्तव्यामुळे दलित समाजात भीती निर्माण झाली असून, या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी प्रदेश भाजपच्या वतीने आज राज्यभर आंदोलने करण्यात आली. याचा भाग म्हणून पाटील यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. तेव्हा चंद्रकांत पाटील बोलत होते.

अनुसूचित जाती मोर्चा भाजपचे प्रदेश अध्यक्ष दिलीप कांबळे, प्रदेश भाजपच्या चिटणीस वर्षा डहाळे, शहर भाजपचे सरचिटणीस पुनीत जोशी, राजू शिळीमकर, राहुल भंडारे, रवी साळेगावकर, महेश पुंडे, अतुल साळवे, किरण कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

चंद्रकांत पाटील म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपला ४०० पेक्षा जास्त जागा मिळाल्या तर हे आरक्षण रद्द करतील असा गैरप्रचार काँग्रेसने केला. तो काही ठिकाणी प्रभावी ठरल्याने त्यांना यश मिळाले. परंतु त्यांचा हा खोटेपणा जनतेच्या लक्षात आला असून, त्यांना आगामी विधानसभा निवडणुकीत मतदार जागा दाखवून देतील.

चंद्रकांत पाटील म्हणाले, बाबासाहेबांनी तयार केलेली घटना बदलावी लागणार नाही. महिलांना राजकीय आरक्षण मिळावे आणि सहा ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळावे, अशा चांगल्या उद्देशाने भाजपने दोनदा घटना दुरुस्ती केली. परंतु काँग्रेसने घटना दुरुस्तीचा गैरवापर केला. देशावर आणीबाणी लादली, २० लाख नागरिकांना तुरुंगात टाकले, मूलभूत स्वातंत्र्यावर गदा आणली, तब्बल ४० वेळा लोकनियुक्त राज्य सरकारे बरखास्त केली. त्याचा आम्ही निषेध करतो.राहुल गांधी आणि त्यांचे सहकारी खोटा विमर्श (नरेटीव) निर्माण करण्यात हुशार आहेत. महाराष्ट्रातही मराठा आणि ओबीसी आरक्षणाबाबत त्यांची भूमिका दुटप्पी आहे. आरक्षणाबाबत शरद पवार, उद्धव ठाकरे आणि नाना पटोले यांनी आपली स्पष्ट भूमिका जाहीर करावी. महाराष्ट्रातील जनता दूधखुळी नाही. या दुटप्पी भूमिकेची शहानिशा केल्याशिवाय राहणार नाही, असेही चंद्रकांत पाटील म्हणाले.




# आमच्याही कामाचं कधीतरी कौतुक करा-आ.दत्तात्रय भरणे

## मदनवाडी येथील गणपती मंडळाच्या कार्यक्रमात भरणेंचे मिश्किल वक्तव्य





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे

समाजामध्ये जो काम करतो तोच चुकतो जो काम करत नाही त्याचा चुकण्याचा काहीच संबंध येत नाही,त्यामुळे आमच्याही कामाचं कधीतरी कौतुक करा अशी मुश्किल टिप्पणी आमदार दत्तात्रय भरणे यांनी केली.आमदार दत्तात्रय भरणे मदनवाडी भिगवण ता.इंदापूर येथे स्वामी विवेकानंद असोसिएशन गणपती मंडळ येथे पत्रकार आणि पोलीस बांधव यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.या ठिकाणी अनेक ज्येष्ठ पत्रकार आणि भिगवण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद मांहागडे आणि त्यांचे कर्मचारी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी दत्तात्रय भरणे म्हणाले की मी साडेपाच हजार कोटी रुपयांचा निधी इंदापूर तालुक्यासाठी आणला त्यातून अनेक विकासकामे पूर्ण केल्याचे मला समाधान आहे.

स्वामी विवेकानंद असोसिएशन गणपती मंडळाच्या कार्यकर्त्यांना या स्तुत्य कार्यक्रमाबद्दल पुढील कार्यासाठी आमदार भरणे यांनी शुभेच्छा दिल्या.या ठिकाणी आमदार दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पत्रकार आणि पोलीस यांचा फेटा,प्रशस्तीपत्र, आणि रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी धनंजय थोरात, दादासाहेब ठोंबरे पोलीस, सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद माहांगडे, ज्येष्ठ पत्रकार चितळकर सर, दादासाहेब थोरात, भरत मल्लाव,सोलनकर सर, डॉ.चवरे सर,मदनवाडीचे नानासाहेब बडगर ,तुकाराम बंडगर, इत्यादी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरपंच व ग्रामपंचायतीच्या हितासाठी हिंगोली जिल्हयातील सरपंच आझाद मैदानावर जाणार

## दहा दिवसात सरपंच परिषदेच्या मागण्या मान्य करा अन्यथा

## राज्यभरातील सरपंच आझाद मैदान आंदोलनाने दणावून सोडू-काकडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव । महादेव हरण

राज्यातील महायुती सरकारने येत्या दहा दिवसात गावगाड्याच्या आणि सरपंच परिषदेच्या मागण्या मान्य न केल्यास राज्यभरातील मोठ्या संख्येने सरपंच आझाद मैदानावर सरकारच्या विरोधात शिळ्या भाकरी खाऊन आंदोलन करतील आणि सरकारचा निषेध नोंदवतील असा इशारा सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र चे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी सरकारला दिला आहे. सन्मानित सरपंच आणि विकसनशील गाव यासाठी राज्यात काम करणाऱ्या सरपंच परिषदेने सरकारला हा इशारा दिला आहे .

राज्यात गेल्या अनेक दिवसापासून आंदोलन करून सरकार दखल घेणार नसेल तर आता आंदोलनाचे हत्यार उपसावे लागेल आणि मोठ्या प्रमाणात आजी माजी सरपंच,उपसरपंच हे आझाद मैदानावर येतील या संदर्भात राज्य कार्यकारणीची नुकतीच एक बैठक सरपंच परिषदे ची हिंगोली येथे सपन्न झाली या बैठकीस सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र चे हिंगोली जिल्हा समन्वयक डॉ देवानंद शंकर गोरे सरपंच वलाना श्री गजानन देवराव सावंत सेनगाव तालुका समन्वयक सरपंच वरखेडा,इंजिनियर दिलीप चव्हाण सेनगाव तालुका प्रसिध्दी प्रमुख सरपंच हत्ता,माधवराव काळे सरपंच. सरपंच विवेक तांबिले वाघजाळी. सरपंच संतोष काळे चोंडी खुर्द, ड विठ्ठल मगर सुरजखेडा, अरुण वाघमारे सरपंच गारखेडा, वसंतराव जाधव सरपंच भगवती, गजानन गवळी सरपंच केंद्र खुर्द, घनश्याम धामणकर सरपंच हाताळा , संजय रवने सरपंच दाताडा गजानन परिस्कर म पिंपरी, सुरेश मुळे सरपंच माझोड, प्रियंका भगत सरपंच वां पिंपरी, दासराव कावरखे सरपंच गोरेगाव, शिवाजी मानमोठे ताकतोडा, नामदेव झाडे बटवाडी, जनार्दन खडसे माळशी, साहेबराव खोडके शेगाव, प्रवीण नायक सावना,रवी पोहकर सरपंच,अनेक आंजी , माजी सरपंच ,सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.सरकारचे ग्रामीण भागावर नाटकी प्रेमराज्य सरकार हे शेतकरी वर्गाला ग्रामिण भागातील तरूणांना व ग्रामपंचायतीला अनेक समस्यांच्या गर्तेत सोडून स्वार्थी राजकारण करत आहे. आज गावकऱ्यांना आनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे अशा वेळी ग्रामपंचायती सरकारने सक्षम केल्या तर आनेक समस्यां अडचणीवर ग्रामपंचायती उपाययोजना करू शकतात.यासाठी सरपंच परिषद मुंबई सातत्याने गावगाड्याच्या हिताच्या संदर्भात राज्यभर आंदोलने करत आसते. त्याचाच एक भाग म्हनून राज्य सरकारने सरपंच परिषदेच्या मागण्या जर मान्य केल्या नाहीतर आम्ही हिंगोली जिल्हयातील शेकडो सरपंच,उपसरपंच व सदस्य प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे ,प्रदेश उपाध्यक्ष अँड.विकास जाधव यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावरच्या ठिय्या आंदोलनात सहभागी होऊ.

# माहेर संस्थापिका लुसी कुरियन व गणेशदादा चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पुणे । प्रतिनिधी

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान... आ. सि. लुसी कुरियन दिदी व राजे श्री समूहाचे अध्यक्ष गणेशदादा चव्हाण आणि परमजीत गांधी यांचे जन्म दिवसाचे औचित्य साधून १० सप्टेंबर रोजी माहेर संस्था वढू बुद्रुक येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. अनेक विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी रक्तदान करून या तिघांना वाढदिवसाचे भेट दिले. आज अनेक गरजूवंताचा आधार, हजारो अनाथांची जबाबदारी घेऊन त्यांना सशक्त करणाऱ्या...जगातील प्रेरणादायी व्यक्तींपैकी बाराव्या स्थानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सि. लुसी दिदीचें कार्य देशभरात निरंतर सुरु आहे.

आ. सि. लुसी कुरियन दिदी व राजे श्री समूहाचे अध्यक्ष गणेशदादा चव्हाण आणि परमजीत गांधी यांनी यावेळी केक कापला... अनेक दिग्गज मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी शिवशाही समूहातील स्वयंसेवकांनी रक्तदान केले.. माहेर संस्थेचे सर्व कर्मचारी तसेच सहकारी यांनी रक्तदान शिबिरासाठी विशेष मेहनत घेतली.. गणेशदादा चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.

## चारोळी

सुखाचे क्षण वेचत जा
दुःख मात्र हसरे करून पहा
येतच राहतात वेगळ्या वाटा
अनुभवातून वेगळं शिकत रहा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

झाडे
लावा
झाडे
जगवा



# १११ रक्तदात्यांनी रक्तानुबंद जपून वाहिली जैनाचार्य परमपूज्य श्री अमोलक ऋषीजींनां आदरांजली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के




रक्तदान हेच जीवनदान,रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान'असे समजले जाते.विविध रुग्णालयांमध्ये आज काही प्रमाणात रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे.याच अनुषंगाने तरुणाईमध्ये रक्तदानाचे महत्त्व रुजविणे आणि त्यांना रक्तदानासाठी प्रेरित करण्याच्या अनुषंगाने श्रीअमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडाचे संस्थापक जैनाचार्य शास्त्रोधारक परमपूज्य श्री अमोलक ऋषीजी म.सा यांच्या ८८ व्या पुण्यतिथी निमित्ताने कडा येथे गांधी महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, रक्तदान ही आजच्या काळाची गरज आहे.अनेकदा वेळेवर रक्त मिळत नसल्याने मृत्यू होण्याच्या घटना कानावर येतात.त्यामुळे तरुणाईने अधिकाधिक रक्तदान करण्याचे आवाहन प्रधानमंत्री श्री हेमंतकुमार पोखरणा यांनी केले.

यावेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तानुबंद जपत रक्तदान केले यावेळी प्रा.डॉ अशोक कोरडे, प्रा.डॉ.जी.बी शिंदे,श्री ज्ञानेश्वर खंदारे यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदविला.यासाठी आनंद ऋषी हॉस्पिटल अहमदनगर रक्तपेढी बँक यांचे सहकार्य लाभले,यावेळी श्री.अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री कांतीलाल चानोदिया,श्री पोपटशेठ भळगट,श्री अनिल झाडमुथा संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.डॉ चंद्रशेखर तळेकर, प्रा.नवनाथ पडोळे, प्राचार्य डॉ ज.मो भंडारी,प्रा.डॉ आशिष कटारिया, प्रा.डॉ. तुकाराम गोंदकर,प्रा.मीरा नाथ, प्रा.डॉ. राधाकृष्ण जोशी, डी.फार्म चे प्राचार्य डॉ म्हस्के, प्रोफेसर डॉ शिवराज पातळे, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.सय्यद,प्राचार्य शिखारे, डॉ जमीर सय्यद प्रा.डॉ. पांडुरंग अनारसे,प्रा.डॉ चंद्रशेखर तळेकर,प्रा.डॉ शिवाजी जगदाळे,श्री सुनील लोमटे,श्री विठ्ठल पालवे,महेंद्र पेटकर, प्रा.डॉ धनश्री मनोत आदी उपस्थित होते.

# त्या कुटुंबाला व दोन्ही व्यापाऱ्यांना आ.दानवे यांनी दिला मदतीचा हात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

वालसावंगी । कौतिक हिवाळे

बुधवारीअचानक लागलेल्या आगीमुळे तिन्ही कुटुंबाचे खूप मोठे नुकसान झाले आहे.त्यामध्ये श्री.नामदेव नेवरे यांचे पूर्ण घर व दुकान संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे व श्री.ज्ञानेश्वर फकीरा सिरसाट यांची सुद्धा गोडाऊन मधील साठवलेली साहित्य ढेप खूप यांचे मोठे नुकसान झाले. आहे तसेच बब्बू बागवान यांची सुद्धा गोडाऊन केळी कॅरेट आंबे कॅरेट जळून खाक झाले आहे जवळपास सर्वांचे २० लाख ते २५लाख रुपये नुकसान झाले आहे याप्रसंगी या सर्व आगीची नुकसानीची पाहणी करून आमदार श्री संतोष दानवे यांनी तिन्ही नुकसानग्रस्त कुटुंबांना सानूग्रह मदत म्हणून २५ हजार प्रत्येकी अशी ७५००० हजार रुपये मदत तात्काळ केली. व सदरील कायदेशीर नुकसान भरपाई तहसील कार्यालय शासनाकडून लवकरात लवकर कुटुंबांना मदत होईल असे आश्वासन दिले त्याप्रसंगी गावातील तंटामुक्त अध्यक्ष व माजी सरपंच श्री हिरालाल कोथळकर, पंचायत समिती माजी सभापती श्री लक्ष्मण मामा मळेकर माजी सरपंच बाळू आहेर, भाजपा शक्ती केंद्रप्रमुख रुखमाजी कोथळकर, भाजपा युवा कार्यकर्ते गणेश गाडेकर अजिंक्य वाघ,भाजपा तरुण किरण राजे कोथळकर,श्री किरण फूसे,गोलू जयस्वाल, फिरोज सौदागर, सलीम शहा, भगवान वाघ, रामदास मोकासरे, श्रीकृष्ण शिरसाठ गुड्डू शेठ,सर्व स्थानिक पदाधिकारी व खूप मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



# राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष तथा दैनिक वीर शिरोमणीचे मुख्य संपादक शंकरसिंह ठाकूर यांना आयडियल नॅशनल अवॉर्ड प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

जागतिक साक्षरता दिनानिमित्त छत्रपती राजे संभाजी प्रतिष्ठान व स्वराज्य सेवाभावी संस्था,नांदेड यांच्या वतीने दि.८ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी दुपारी दोन वाजता महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पात्र व्यक्तिंना सन्मानित करण्यात आले आहे.हा कार्यक्रम वजिराबाद भागातील जिल्हा परिषद मल्टीपर्पज शाळेच्या शेजारी असणार्या के.आर.एम. महिला महाविद्यालयाचे सभागृहात आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.जगदीश कदम,नांदेड महिला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी,डॉ.हंसराज वैद्य, शिव प्रसाद राठी,लोट, साहित्यिक रुपाली वागरे,बालाजी कराळे,धम्मपाल हनवते आदी जण उपस्थित होते.

महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा आयडियल नॅशनल अवॉर्डपुरस्कार हा पत्रकार शंकरसिंह ठाकूर यांना प्रदान करण्यात आला आहे. त्यांना सन्मानपत्र,सन्मानचिन्ह, स्नेह वस्त्र,ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरूप असलेले ते मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले आहे.त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्या बदल सर्व स्तरावरून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

कंधार तालुक्यातील पांगरा नगरीचे भूमिपुत्र असलेले शंकरसिंह ठाकूर हे उच्च विद्याविभुषित असून ते गेल्या अनेक वर्षांपासून पासून पत्रकारिता



क्षेत्रात कार्यरत आहेत.त्यांनी केलेल्या भरीव योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला आहे.पत्रकार शंकरसिंह ठाकूर हे पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून ते सरकार,नेते,भ्रष्टाचार, राजकारणाची पोलखोल यावर आपल्या लेखणीतुन चांगलाच आसूड उगारतात.त्यांनी बातम्यां द्वारे समाजाचे मागण्याना वाचा फोडून न्याय मिळवून देणे,समाजात जनजागृती करणे, वास्तविकता मांडणे,सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे , समाजप्रबोधनाचे काम त्यांनी पत्रकारितेतून केलेले आहे. त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपला शिक्का उमटवला आहे.

यापूर्वी ही त्यांना पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरीबद्दल अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.त्यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जेष्ठ पत्रकार अँड. रमेश माने, मारोतीशिकारे,संजीवकुमार गायकवाड,रमेशसिंह ठाकूर, विनायक कामठेकर,राजू ठाकूर, राजकुमार राजपूत, धोंडीरामसिंह राजपूत,मारोती कांबळे,सोपान जाधव,मारोती देवकते,प्रणय कोवे,नीलेश गायकवाड,वैशाली हिंगोले,कीर्तिमाला महाबळे,मोइन चव्हाण,उदल जाधव,जितेंद्र चव्हाण,गजेंद्र सिंह ठाकूर,रोहित ठाकूर,पुरोगामी पत्रकार संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष दत्तात्रय मुजमुले,पुरोगामी पत्रकार संघाचे आष्टी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब साबळे,यांच्यासह प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सोशल मीडियावर अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.या निवडी बदल अजूनही अनेक सामाजिक संघटना,राजकिय पुढारी व अनेक मित्र मंडळी कडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## राहुल गांधी सत्तेत आले तर आरक्षण जाणार,हे स्पष्ट

लोकनेता न्यूज नेटवर्क । **मुंबई (वृत्तसंस्था)**

राहुल गांधी सत्तेत आले तर आरक्षण जाणार, हे स्पष्ट आहे. त्यामुळे आम्ही सर्व समाजामध्ये जाऊन समाजप्रबोधन करणार असल्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. आरक्षणाच्या मुद्द्यावर भाजपच्या वतीने राहुल गांधी यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांच्या विरोधात राज्यभरात आंदोलन करण्याचा निर्णय भाजपच्या वतीने घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी माध्यमांशी संवाद साधला.लोकसभा निवडणुकीत आम्ही चुकलो, हे आम्हाला मान्य आहे. मात्र त्यात आम्ही सुधारणा करण्याचा प्रयत्न करत असल्याचे भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी म्हटले आहे. लोकसभेमध्ये ज्या चुका झाल्या त्या विधानसभेला दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही दावा करत नाही मात्र प्रयत्न नक्कीच करणार, असे देखील बावनकुळे यांनी म्हटले आहे. सरकार कोणतेही असो, काही ना काही कमतरता राहतेच, मात्र त्या दूर करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे बावनकुळे यांनी म्हटले आहे.अजित पवार भारतीय जनता पक्षासोबत राहणार नसल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. यावर देखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. अजित पवार आताच नाही तर पुढील अनेक वर्षे आमच्या सोबत राहतील, असा दावा बावनकुळे यांनी केला आहे.

# विघ्नराज गणेश मित्र मंडळाचा सामाजिक उपक्रम: रक्तदान शिबिराचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

कॅनाल रोड, बीड येथे स्थापित विघ्नराज गणेश मित्र मंडळाने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध सामाजिक उपक्रम राबवून समाजातील लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे दरवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करताना, सामाजिक योगदान देण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करणे. या वर्षी, मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात मोठ्या प्रमाणावर युवा कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. शिबिराच्या निमित्ताने समाजातील रक्ताची गरज भागवण्यासाठी अनेक स्थानिक नागरिकांनी पुढे येऊन रक्तदान केले.

रक्तदान शिबिराच्या आयोजनामुळे अनेक गरजू रुग्णांना रक्ताची तातडीने उपलब्धता होईल, असे मंडळाच्या सदस्यांनी सांगितले. रक्तदानाचे महत्व लक्षात घेऊन, या उपक्रमात सहभागी होणाऱ्यांनी समाजसेवेचा एक आदर्श ठरवला आहे.मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या उपक्रमासाठी विशेष तयारी केली होती, ज्यामुळे शिबिराच्या आयोजनास चांगला प्रतिसाद मिळाला. या उपक्रमामुळे समाजात जागरूकता वाढविणे आणि सामाजिक एकजुटीला उत्तेजन देणे हे उद्दिष्ट साधले गेले आहे. मंडळाच्या पुढील योजनांमध्ये अशा प्रकारच्या उपक्रमांची आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.



## जिद्द व चिकाटीमुळे पहिल्याच प्रयत्नामध्ये यश



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील पळसखेडा मुर्तड येथील पूजा नारायण सोनुने हिने पहिल्याच प्रयत्नामध्ये यश संपादन केले पूजा नारायण सोनुने यांच्या मनामध्ये जिद्द व चिकाटी मुळे रायगड पोलीस दलामध्ये१५० पैकी१२३ गुण मिळून रायगड पोलीस दलामध्ये निवड झाली पूजा नारायण सोनुने यांची ग्रामस्थांच्या वतीने सर्वत्र कौतुक केले आहे यावेळी दानापूरचे माजी सरपंच अरुण शिंदे, अंकुश पाटील दळवी, अनिल दुतोडे, योगेश उदार साहेब, माणिक पाटील दळवी, गणेश पवार, अंकुश बावस्कर तलाठी, विलास देशमुख, भागवत सोनुने, ओम दळवी, देवा शिरसाट, आदींनी कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

## नव महाराष्ट्र संघ गणेश मंडळाच्या वतीने तालुक्यात प्रथमच अष्टविनायक दर्शन देखावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला शहरातील नव ममहाराष्ट्र संघ गणेश मंडळ डेबुजी चौक, परीट गल्ली सांगोला यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन हाराष्ट्र संघ गणेश मंडळ डेबुजी चौक, परीट गल्ली सांगोला यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंडळाच्या वतीने यावर्षी सांगोला तालुक्यात प्रथमच अष्टविनायक दर्शन देखावा सादर करण्यात आला असून हा देखावा बघण्यासाठी गणेश भक्तांची गर्दी होत आहे. गणेशोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.


शुक्रवार दि.१३ रोजी अथर्वशीर्ष पठण व रुद्र महिला भजनी मंडळ यांचे भजन, शनिवार दि. १४ रोजी दुपारी ४ वाजता चित्रकला स्पर्धा, रविवार दि.१५ रोजी महाप्रसाद १२ ते ०४ व सायंकाळी महाआरती, सोमवार दि.१६ रोजी अथर्वशीर्ष पठण व श्रीराम महिला भजनी मंडळ यांचे भजन, मंगळवार दि.१७ रोजी पारंपरिक वाद्यांसह भव्य मिरवणुक आयोजित केली असून या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## आ.बाळासाहेब आजबे यांच्या पुढाकाराने मेहकरी धरण ओव्हरफ्लो

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील सर्वात जास्त साठवण क्षमता असलेले मेहकरी धरण बुधवारी भरले.सिनाधरणातून उपसा सिंचन करून या प्रकल्पात आ बाळासाहेब आजबे यांनी कोणताही गाजावाजा न करता योजना कार्यान्वित करून पाणी आणले होते.आष्टी तालुक्यात यावर्षी सगळीकडे चांगला पाऊस झाल्याने तालुक्यातील सर्व लघु मध्यम प्रकल्प तुडुंब भरून वाहत आहेत.सर्वात आधी कडा प्रकल्प भरला,त्यानंतर एक एक करत सर्व धरणे काठोकाठ भरली.मेहकरी हे धरण भरणे मात्र बाकी होते.आ.बाळासाहेब आजबे यांनी पंधरा दिवसापूर्वी सिना धरणातून उपसा सिंचनाद्वारे मेहकरीमध्ये पाणी सोडण्याची योजना कार्यान्वित केली होती.हे पाणी आणि मेहकरी नदीतून येणारे पाणी या दोन्हीमुळे बुधवारी मेहकरी धरण भरले.त्यामुळे तालुक्यातील



चौदा गावांचा सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे.सीना धरणात कुकडी प्रकल्पातून ओव्हरफ्लोचे पाणी येते.त्यातील अर्धा टीएमसी पाणी उपसा सिंचन योजनेने मेहकरी धरणात येते.सिना धरण मंगळवारी तर मेहकरी धरण बुधवारी असे यावर्षी एकाच दिवसाच्या फरकाने भरले.

# अजित पवार आमच्या ग्रुपचे कॅप्टन ते मध्येच शस्त्र टाकू शकत नाहीत

## छगन भुजबळांचे दादांच्या बारामती सोडण्याच्या विधानावर भाष्य

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक न लढवण्याचे संकेत दिलेत. त्यावर आता मंत्री छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार आमच्या ग्रुपचे कॅप्टन असून, ते मध्येच अशी शस्त्रे टाकू शकत नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे.

अजित पवार यांनी रविवारी बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार नसल्याचे संकेत दिले होते. त्यानंतर राष्ट्रवादीच्या गोटात एकच खळबळ माजली होती. मंत्री छगन भुजबळ यांना सोमवारी याविषयी छेडले असता त्यांनी अजित पवार मध्येच अशी शस्त्रे टाकू शकत नसल्याचे ठाम व्यक्त केले. छगन भुजबळ म्हणाले की, अजित पवार हे आमच्या ग्रुपचे कॅप्टन आहेत. ते निश्चितच निवडणूक लढवतील. त्यांना मध्येच अशी शस्त्रे टाकता येणार नाहीत. लोकसभा निवडणुकीत जे झाले ती व्यथा त्यांनी मांडली आहे. मी स्वतः ७८ वर्षांचा आहे. मग मला ते लढायला का सांगतात? वय आहे ते तो काही मुद्दा नाही.छगन भुजबळ यांनी यावेळी शिवसेनेने अर्थखात्यावर व्यक्त केलेल्या नाराजीवरही भाष्य केले. ते म्हणाले, सरकार सर्वांचे पैसे देईल. पण त्यासाठी भांडवल लागते. हे भांडवल जसजसे जमा होईल तसतसे दिले जाईल. उशीर होणे हे काही नवे नाही. काँग्रेस राष्ट्रवादीच्या काळातही ३-३ वर्षे उशीर होत होता. प्राधान्य कशाला हे या प्रकरणी ठरवले जाते. त्यामुळे महायुतीच्या तिन्ही घटकांना आगामी निवडणुकीत चांगले यश मिळवायचे असेल तर त्यांनी असे एकमेकांवर विधाने करू नये. विरोधकांना खाद्य पुरवू नये.अजित पवार रविवारी बारामती येथील एका सभेत बोलताना म्हणाले होते की, बारामतीत आपण सर्वांगीण विकास केला. राज्यात सर्वाधिक निधी दिला. पण मी ही एक माणूस आहे. मला कधीकधी विचार येतो की, एवढी सगळी कामे करूनही बारामतीकर वेगळा निर्णय घेऊ शकतात. आता मलाही राजकारणात ३३-३४ वर्षे झाली आहेत. मी तर आता दुसरा खासदार राज्यसभेवर पाठवू शकतो. त्याआधी संसदीय समितीने सुनेत्रा पवार व प्रफुल्ल पटेलांना उमेदवारी दिली होती. मध्यंतरी राजेश विटेकरला आमदार केले. शिवाजीराव गर्जेंना केले. आता राज्यपाल नियुक्त आमदारांचे काय होते ते माहिती नाही. पण जर यंदाच्या निकालांसारखी गंमत होणार असेल तर आपली झाकली मूठ सव्वा लाखाची म्हणायचे.अजित पवार पुढे म्हणाले की, आता मी स्वतः ६५ वर्षांचा झालो आहे. मी समाधानी आहे. पण जिथे पिकतं, तिथे विकत नसतं. एकदा बारामतीकरांना कुणीतरी मी सोडून आमदार मिळायला हवा. मग तुम्ही ९१ ते २०२४ च्या माझ्या कारकिर्दीची व त्या नव्या माणसाच्या कारकिर्दीची तुलना करा, असे उपरोधिक आवाहनही अजित पवार यांनी यावेळी बारामतीकरांना केले.



# कर्मयोगी शंकररावजी पाटील यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य इतिहासामध्ये नोंद घेण्यासारखे-माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

माजी खासदार श्रद्धेय कर्मयोगी शंकररावजी पाटील यांच्या १८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील म्हणाले की कर्मयोगी शंकररावजी पाटील यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य इतिहासामध्ये नोंद घेण्यासारखे आहे.भाऊंचा ८२ वर्षाचा आयुष्यातील प्रवास यशस्वी होता.माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व युवा नेते राजवर्धन पाटील आणि मान्यवरांनी इंदापूर महाविद्यालयातील कर्मयोगी भाऊंच्या समाधी स्थळाचे दर्शन घेऊन त्यांना आदरांजली अर्पण केली.भजन मंडळाने यावेळी भजनाचे सादरीकरण केले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग,विद्यार्थी कल्याण मंडळ व राष्ट्रीय छात्रसेना आयोजित श्रद्धेय कर्मयोगी शंकररावजी पाटील (भाऊ) यांच्या १८ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त एक पेड माँ के नाम ' या उपक्रमांतर्गत राज्याचे माजी मंत्री व राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते ५०० रोपांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.हर्षवर्धन पाटील म्हणाले की,' भाऊंनी आपल्या कर्तुत्वाने आणि सर्वांच्या सहकार्याने इंदापूर तालुक्याचे नाव दिल्लीच्या संसदेपर्यंत नेले. भाऊ हे उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे,दूरदृष्टीचे नेते होते.भाऊंनी पुढील ५० वर्षाचा दृष्टिकोन समोर ठेवून उजनी धरण तसेच कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना,शैक्षणिक संस्था,कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापना करून इंदापूर तालुक्याचा विकास केला.आर्थिक सुबत्ता निर्माण करण्याचे कार्य भाऊंनी केले.भाऊ असतानाचा काळ आणि नंतरचा काळ आपण सर्वांनी पाहिला.भाऊ नंतर ही सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर आली.गेल्या १८ वर्षांनंतर देखील खंबीरपणे भाऊंच्या मार्गदर्शनानुसार आपण ती जबाबदारी समर्थपणे पार पाडत पुढे जात आहोत.अनेक अडचणी आल्या,राजकारणात अडथळे निर्माण केले गेले परंतु यातून मार्ग काढत आपण पुढे गेलो.नवीन पिढीने भाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य करावे.यावेळी ड.राकेश शुक्ला यांनी आपले मनोगत व्यक्त केले.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.उत्तम माने यांनी 'एक पेड माँ के नाम ' या उपक्रमाचा उद्देश सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.भरत भुजबळ आणि श्याम सातार्ले यांनी केले.

## भाजपाने अशोक चव्हाण यांना थप्पीला लावले-मा.खा.भास्करराव पा.खतगावकर




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

माझ्या राजकीय जीवनात कधीच मी जात धर्म पाहिलो नाही सर्व जाती समावेशक काम केले आहे, अशोक चव्हाण यांनी भाजपात गेल्यानंतर एक मराठवाड्याचा मोठा नेता म्हणून त्यांना कॅबिनेट मंत्रीपद देतील आणि नांदेड जिल्ह्याचा विकास होईल असे वाटले होते पण भाजपाने अशोक चव्हाण यांना थप्पीला लावले आहे. असे उद्गगार मा.खा.भास्करराव पाटील खतगावकर यांनी आयोजित कार्यकर्ता संवाद बैठकीत केले.

खतगावकर बोलताना पुढे म्हणाले की, पक्षासोबत आणि माझ्यासोबत एक निष्ठेने जी गोरगरीब माणसं होती त्यांना सभापती पर्यंत आपण पोहोचलो या सर्वांच्या ताकदीवरच आगामी काळात नायगाव विधानसभा मतदारसंघ हे डॉ.मिनल खतगावकर ह्या निवडणुक रिंगणात राहणार असून माझा राजकीय वारसा पुढे न्यावा एवढाच माझा यामागे हेतू आहे असेही ते म्हणाले.शंकर नगर

आयोजित कार्यकर्ता सवांद बैठकीमध्ये अध्यक्षस्थानी माजी मंत्री माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर यासह डॉ .मिनलताई खतगावकर, उपमहापौर सरजीत गिल,मसुद देसाई,श्रीराम पाटील राजूरकर, माधवराव पाटील सुगावकर, संजीव कुलकर्णी, शिवकुमार यसगीकर, मंगल पांडे, बाळासाहेब पाटील, प्रताप पाटील जिगळेकर यासह अधिजनाची प्रमुख उपस्थिती होती. बिलोलीचे माजी नगराध्यक्ष भीमराव जेठे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की भास्करराव पाटील खतगावकर यांनी कायमचे कॉंग्रेस पक्षातच राहावे, तर नायगाव उमरी धर्माबाद बिलोली देगलूर तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी दत्ता हरी पा. कावळगावकर, गोविंद पाटील सोनटक्के, डॉ. रत्नाळीकर, भावना दासटवार, संभाजी पाटील शिंदे, बाळू मुदखेडे, गणपतराव पाटील धुपेकर, नागनाथ आनंतवाड, शेख गौस रामतीर्थ, दिगंबर हजारे, मेहताब पठाण, मोहित पाटील सुगावकर, मारुती पटाईत, गंगाधर गायकवाड, आनंदराव बिरादार, साई पा.घुंगराळा, मंगल देसाई यासह आद्यजनाची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजु गंदीगुडे यांनी तर आभार संतोष पाटील पूयड यांनी मानले.

## त्या कुटुंबाला वर्गमित्रांनी दिला मदतीचा हात



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

येथे दोन दिवसांपूर्वी भीषण अग्नितांडवात किराणा दुकान,फळांचे गोडाऊन,राहते घर घरातील साहित्य, दोन दुचाकी,हॉटेल जळून खाक झाले होते.यामुळे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान तीन कुटुंबाचे झाले होते.दरम्यान या आगीमध्ये मोलमजुरी करून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या संदीप नवले यांचे संपूर्ण राहते घर घरातील सर्व साहित्य,डाळदाना,दुचाकी,रोख ६४००० रुपये जळून मातीमोल झाल्याने या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.संसारच त्यांचा चक्क उघड्यावर आला होता.या परिवाराला अनेक दानशूर व्यक्तिंनी आर्थिक मदतीचा हात दिला होता.त्यांच्या संसाराला व कुटुंबाला आर्थिक मदत म्हणून त्यांचा लहान भाऊ ज्ञानेश्वर नवले यांचा वर्ग मित्रांनी २५००० ची अर्थीक मदत केली.हि मदत संदीप व ज्ञानेश्वर नवले यांचे वडील नामदेव नवले यांच्याकडे सुपूर्त केली

या वेळी दिलीप बोरमळे, कपिल बोरमळे,दिलीप वाघ,विजय गवळी, सचिन लाठे,कौतिक हिवाळे,गणेश हिवाळे, कुलदीप बारवल, अविनाश धनवई व संपूर्ण नवले कुटुंब उपस्थित होते..

## बोगस डॉक्टरांची चौकशी करून कारवाई करावी,छावा संघटनेची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील बोगस डॉक्टरांची योग्य ती चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी नायगाव छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड व जिल्हा आरोग्य विभाग नांदेड यांच्याकडे केली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस चालू असल्या कारणाने सगळीकडे दूषित वातावरण संसर्ग रोग असल्याने तालुक्यातील बहुतांश जनता आजारी पडत आहे. या दूषित वातावरणाच्या नावाखाली तालुक्यात बरेच बोगस डॉक्टरांचा कमाईचा धंदा झाला आहे. गोरगरीब जनतेची पिळवणूक होत आहे. व काही डॉक्टरांकडे कुटलीही डिग्री नसताना गोरगरीब जनतेला लुटण्यासाठी आपले दुकान उघडुन बसले आहेत. व तालुका आरोग्य अधिकार्यांना हाताशी धरून काही डॉक्टर आपला उद्योग चालवित आहेत अशी ही तक्रार निवेदनात निवेदनकर्त्यांनी केली आहे.त्यासाठी तालुक्यातील सर्व डॉक्टरांची निवेदन कर्त्यांच्या उपस्थितीमध्ये कागद पत्र तपासणी आपल्या स्तराऊन करण्यात यावी. तसेच बोगस डॉक्टर अढळून आल्यास त्यांच्यावर तात्काळ कारवाई करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. अन्यथा अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने नायगांव तहसील कार्यालय समोर आंदोलन करण्यात येईल . असे जिल्हा अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड यांना निवेदन देण्यात आले

या वेळी अखिल भारतीय छावा संघटना नायगाव तालुका अध्यक्ष, प्रताप पाटील कदम सोमठानकर, ता.संपर्क प्रमुख, साई पाटील मोरे, साई पाटील मोकादरेकर यांची उपस्थिती होती.

## संत भगवान बाबा गणेश मंडळ पांग्रा डोळे यांच्या वतीने रक्तदान व आरोग्य शिबीर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

दि. १२/०९/२०२४ रोजी लोणार तालुक्यातील ग्राम पांग्राडोळे येथे संत भगवान बाबा गणेश मंडळ यांच्या पुढाकाराने, रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी पार पडले. गावातील ७६ तरुणांनी ऊस्पुर्तपणे रक्तदान केले. सोबतच २०० हुन अधिक रुणांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबिरसाठी छत्रपती संभाजीनगर येथील हेडगेवार हॉस्पिटलच्या दत्ताजी भाले रक्तपेढीने व डॉ पांडुरंग मगर पाटिल, डॉ सागर डोळे, डॉ उज्वला गिऱ्हे या चइइड चऊ डॉक्टरांनी फक्त एक



दिवसाच्या पूर्व विनंतीवर त्यांचा अनमोल वेळ देऊन मोलाचे सहकार्य केले. मोफत सुगर तपासणी व औषधी साठी झकऊ रायगाव डॉ तनवीर व टीम ने सुद्धा सहभाग घेतला. गावातील डॉ गजानन, डॉ वैभव, डॉ सचिन, डॉ अश्विनी यांनी त्यांची जझऊ बंद ठेवून यांनीही सहभाग घेतला. गावातील श्री कृष्ण गणेश मंडळ यांनी रक्तदान मध्ये सहभाग घेतल्यामुळे गावात एक जुटता दिसून आली. रक्तदान मधे तालुक्यातील पिंपळनेर येथील ८ तरुणांनी सहभाग घेतल्यामुळे समाजात रक्तदान विषयी जागृतात दिसून आली. गणेश उत्सवा निमित्त जनसेवेसाठी रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीर गावात ठेवल्यामुळे संत भगवानबाबा गणेश मंडळाचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे, मंडळातील अध्यक्ष नितीन, आदिनाथ, ओम, विकास, वैभव, राज, बादशहा, अंकित, समाधान, अजय, विवेक, जय, संस्कार, यश, सचिन, नागेश, दीपक या तरुण मुलांनी दोनच दिवसपूर्वी प्लान केलेले शिबीर यशस्वी होण्यासाठी खूप मेहनत घेतली त्यासाठी गावातील सर्व वरिष्ठ, सामाजिक, शैक्षणिक व राजकिय क्षेत्रातील मंडळींनी मोलाचे सहकार्य केले.

# आधुनिक काळातील आरोग्यदुत सौताड्याचे किरण शिंदे पाटील;तब्बल ४१ वेळा रक्तदान करणारा अवलिया..!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकजण आप आपल्या कामाच्या निमित्ताने कामाच्या ठिकाणी तर नोकरीच्या निमित्ताने ये जा करत असतो. मानवनिर्मित संकटे कधी सांगून येत नाहीत, मानवी प्रगती बरोबर दुचाकी चारचाकी वाहनांची संख्या वाढली त्या मुळे अपघातांची संख्यासुद्धा जागतिक आकडेवारीनुसार प्रचंड वाढली आहे. ही निश्चितच चिंताजनक आहे, देशात रोज कुठे ना कुठे कोणत्या नाही कोणत्या रस्त्यावर अपघात घडतात या अपघातातून वृत्त पाहणाऱ्यांची अपंग होणाऱ्यांची तसेच रक्ता अभावी मृत्यू पडणाऱ्या रुग्णांची संख्या ही लाखोंच्या घरात आहे. अपघात घडल्यानंतर प्रामुख्याने रक्तस्राव मोठ्या प्रमाणावर होतो, रुग्णालयात अत्यवस्थ अवस्थेत रुग्ण दाखल केल्यानंतर प्राधान्याने रक्ताची गरज भासते, रक्ताचा तुटवडा जाणू नये किंवा एखाद्या रुग्णाला वेळेवर रक्त पुरवठा न मिळाल्याने मृत्यू येऊ नये म्हणून प्रत्येक सरकारी रुग्णालयाने, खाजगी दवाखान्यांनी रक्तदान करण्यासाठी जनजागृती केलेली आहे. भारत सरकार रक्तदाना विषयी जनजागृती करण्यासाठी लाखो रुपये खर्च होत आहे, त्याच धर्तीवर व सामाजिक भान ठेवत सौताडा गावचे रहिवासी तथा झुंजार नेताचे पत्रकार व पाटोदा/शिरूर(कासार) कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील यांनी आजपर्यंत ४१ वेळा विविध रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केले आहे. दरवर्षी दोन वेळा ते स्वैच्छेने व आत्मविश्वासाने रक्तदान करतात व नवरक्तदात्यांना प्रेरणा देतात की रक्तदान केल्याने मानवी आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही, तसेच मानसिक भिती घालण्यासाठी ते प्रेरक म्हणून पुढे येत आहेत. रक्तदानाविषयी समाजमनात विविध गैरसमज भिती आहे. रक्तदान केल्याने कोणताही वाईट परिणाम शरीरावर



होत नाही किंवा चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे असे प्रकार होतात असा समज समाजामध्ये आहे तो चुकीचा आहे. असे किरण शिंदे पाटील हे सांगतात, आज रक्तदान ही काळाची गरज बनली असून त्या दृष्टीने प्रत्येकाने वर्षातून एकदा रक्तदान केलेच पाहिजे व आपल्या केलेल्या रक्तदाना मुळे एका व्यक्तीचा जीव वाचणार आहे. त्या मुळे त्या व्यक्तीला एक प्रकारचे जिवनदानच आपल्या रक्तदानामुळे मिळणार आहे. त्या मुळे नव तरुणांना व नवीन रक्तदान करू इच्छिणाऱ्यांना मी आवाहन करतो की आपण न घाबरता न मानसिक भीती ठेवता रक्तदान करण्यासाठी पुढे यावं व आपल्या सामाजिक जडणघडणीमध्ये आपलाही खारीचा वाटा असावा, या शुद्ध भावनेने रक्तदान करावे. व आपली सामाजिक जबाबदारी, बांधिलकी जपावी व आपल्या देशाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला असे आवाहन किरण शिंदे पाटील यांनी नवतरुण, नवरक्तदात्यांना केले आहे. या मधुन समाजाविषयी अपार तळमळ, बांधीलकी मानणारा एक आधुनिक आरोग्यदुत सौताडा रामेश्वर नगरी मध्ये जन्माला आल्याचा अभिमान सौताडकरांना वाटणे स्वाभाविक व नैसर्गिक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने मोठी प्रगती केलेली असली तरी आज ही कोणतही विज्ञान तंत्रज्ञान मानवी रक्त निर्मिती करू शकल नाही, त्या मुळे रक्तदान हे असे गुप्तदान आहे की ते नावाचा कसलाही उल्लेख ना करता केले जाते. व ज्या वेळेस रक्त घेणारा रक्त घेतो तेव्हा तो हृदयापासून कृतार्थ होत असेल या मुळे नवतरुणांनी न भिता, मानसिक भिती बाळगता रक्तदान करावे व आपली सामाजिक जबाबदारी, आपली संस्कृती समृद्ध करावी.

# रोषगाव येथे गणपती विसर्जन आनंदात उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**





धर्माबाद तालुक्यांतील रोषणगाव येथे सार्वजनिक गणेश मित्रमंडल व गावकरी मंडळी यांनी सुखकर्ता दुखहर्त्याचे आज आनंदाने निरोपर दिला.७ दिवस आनंदाने सर्व गावकरी मंडळी ऐकत्र येऊन गणरायाची पुजाअर्चना करण्यात आली. रोषनगाव गावातील सर्व गावकरी मंडळी, महिला मंडळ बालगोपाळ,तरुण मित्र मंडळ गणरायाला निरोप देण्यासाठी दिवसभर आतुर होते.

येथील सर्व गावकरी तरुण मित्रमंडळींनी सकाळी महाप्रसादाचा आयोजन करण्यात आले होते गणरायाच्या मिरवणुकीसाठी धर्माबाद तालुक्यातून भाविक रोषनगाव येथे आले होते. दुपारी ४ वाजता मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली.मौजे रोषनगाव येथे गणपती विसर्जन उत्साहात साजरा करण्यात आला मिरवणुकीत ज्येष्ठ मंडळी, तरुण,बालगोपाळ सामील झाले होते. मिरवणुक अगदी उत्साहात आनंदात पार पडली रोशनगाव सार्वजनिक साईराज गणेश मंडळ कार्यकारणी अध्यक्ष - जयराम राजेशोर जाधव, उपाध्यक्ष मारोती विठ्ठल शिवशट्टे, सचिव अविनाश हानमंतराव माळगे, शिवलिंग ब्रह्मानंद जाधव, विकास शिवराज भडगे, दिनेश पा जाधव, परमेशोर विठ्ठल शिवशट्टे, ओम त्रिंबक माळगे, त्रिंबक शंकरराव माळगे, मनमत करण स्वामी महाराज, ब्रह्मानंद मुकुंदराव जाधव, श्रीनिवास शिवाजीराव शिवशट्टे, साहेबराव गजानन जाधव, योगेश शिवाजी माळगें, सोमनाथ मारोती मालगे, शिवाजी काशिनाथ शिवशट्टे,मारोती गादेवार, मन्मथ राचप्पा मालगे, सुभाष पा शिवशट्टे, अनुज संतोष शिवशट्टे, सुरेश विशोनाथ शिवशट्टे, लोकेश मनोज माळगे, गंगाप्रसाद विशोनाथ शिवशट्टे, गणेश मालगे, दुर्गा मालगे, शरवी मालगे, नक्षत्रा मालगे, श्रेयाजा माळगे, व ज्येष्ठ महिला व पुरुष मंडळी मिरवणुकीत सर्व तरुण मंडळीणी बालगोपाळानी नाचण्याचा खुप आनंद लुटला. कार्यक्रमाचे आयोजन सार्वजनिक साईराज गणेश मंडळ रोशनगाव व समस्त गावकरी मंडळी यांच्यावतीने करण्यात आले होते. मिरवणुकी प्रसंगी ज्येष्ठ नागरिक बाभली बंधारा कृती समितीचे अध्यक्ष नागोराव पाटील जाधव रोशनगावकर व ज्येष्ठ नागरिक हानमत तीपाजी माळगे व सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भडगे , उपसरपंच प्रतिनिधी नागनाथ पाटील माळगे , सदस्य सिद्धेश्वर विठ्ठल शिवशट्टे, सदस्य साईनाथ काशिनाथ स्वामी, सदस्य विजय घेण्याची देवके ,प्रशांत बालाजी जाधव, अवधूत पाटील जाधव, नागनाथ शंकरराव माळगे, नागनाथ माधवराव माळगे,सदानंद शंकरराव माळगे, अमोल हनुमंतराव माळगे , अप्पाराव पाटील शिवशट्टे , माधव गंगाधर शिवशट्टे, साईनाथ पा शिवशट्टे, यादव पाटील जाधव, अशोक लक्ष्मण माळगे, साईनाथ पा जाधाव, साईनाथ पा माळगे,विश्वनाथ पाटील शिवशट्टे, सोमनाथ पाटील शिवशट्टे,मारोती पा जाधव, संतोष विठ्ठल शिवशट्टे, हांनमत पा माळगे,संभाजी पा जाधव,लोकेश शंकर माळगे, गावकरी मंडळी महिला व पुरुष मंडली ,बाळगोपाळ आदिं उपस्थीत होते. पोलीस प्रशासनाकडून व्यंकट खराडे उपस्थित होते. समस्त गावकरी मंडळीच्या वतीने आनंदात उत्साहात गणपतीचे विसर्जन करण्यात आले.

# गजानन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मागण्या संदर्भात सेनगाव तहसील कार्यालयावर मोर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगाव येथे वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष गजानन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्या संदर्भात दिनांक १३ सप्टेंबर रोजी नालंदा बुद्ध विहार ते तहसील कार्यालय जाहीर निषेध मोर्चा काढण्यात आला असून, वसमत तालुक्यातील रंजे आडगाव कार्यालयात कार्यरत असलेले तलाठी संतोष पवार यांच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून हत्या हत्या करण्यात आली होती त्या पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सेनगाव येथे जाहीर निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते व तसेच हिंगोली जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीचे पंचनामे न करता शेतकऱ्यांना सरसकट तात्काळ मदत द्यावी, शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा देण्यात यावा, शेतकऱ्याची कर्जमाफी करावी, शेतकऱ्याच्या जनावराचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्यावी अशा विविध मागण्यासाठी सेनगाव येथे जाहीर निषेध मोर्चा काढण्यात आला होता या मोर्चामध्ये अनेक महिला व पुरुषांनी सहभाग नोंदविला होता यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा कार्याध्यक्ष राजूभाऊ इंगोले, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष गजाननराव देशमुख, भीमराव भालेराव, सुदाम वाघमारे, संजू वाघमारे, संजय देशमुख, मनोज देशमुख, नागेश देशमुख, सिद्धार्थ गायकवाड, यांच्यासह आदीची उपस्थिती होती सेनगाव तहसीलदारांना निवेदन देऊन तात्काळ पीडित कुटुंबांना न्याय मिळवून द्यावा व हिंगोली जिल्ह्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीचे पंचनामे न करता शेतकऱ्यांना सरसकट मदत द्यावी या संदर्भात तहसीलदारांना निवेदन देण्यात आले यावेळी सेनगाव पोलीस स्टेशनच्या वतीने कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता,

# वाहेद पटेल यांना कै.आमदार वसंतराव काळे आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पारध । रमेश जाधव**

भिलदरी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने देण्यात येणारा कै. आमदार वसंतराव काळे आदर्श शिक्षक पुरस्कार यावर्षी प्रसिद्ध क्रीडा शिक्षक वाहेद फकीरा पटेल यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार राजर्षी शाहू महाविद्यालयात आयोजित समारंभात संस्थेचे संस्थापक सचिव प्रो. डॉ. सुगदेव मांटे यांच्या हस्ते तर प्रा. बी.बी. चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रदान केला. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी क्रीडा संस्कृती जोपासली पाहिजे विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी महाविद्यालय व संस्थेने पुढाकार घेण्याचे आवाहन सत्काराला उत्तर देताना प्रा. वाहेड पटेल यांनी केले. कार्यक्रमाच्या वेळी प्रा. डॉ. सुगदेव मांटे यांनी आपल्या संबंधित अनेक आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अमोल बांडगे यांनी आतापर्यंत प्रदान केलेल्या आदर्श शिक्षक पुरस्काराची माहिती दिली तर सन्मानपत्राचे वाचन प्रा. मंगेश लोखंडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल मगर तर आभार मुख्याध्यापक विलास लोखंडे यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशवंत संघर्ष सेनेच्या वतीने सौं.वैशाली वाघ यांना सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोनगाव । महादेव हरण**



सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथील रहिवाशी असलेल्या व सर्व सामान्य जनतेच्या कामासाठी २४ तास तत्पर असलेल्या सौं वैशालीताई वाघ आजेगांवकर यांना यशवंत संघर्ष सेनेच्या वतीने सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर झाला आहे.

सेनगाव तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांसाठी, दिव्यांग बांधवासाठी व तसेच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी सौं वैशालीताई वाघ आजेगावकर ह्या मागील ३ वर्षांपासून सतत न्याय देण्याचं काम सेनगाव तालुक्यात करत आहेत, व प्रशासन देखील त्याच्या कामाची दखल घेत आहे, त्याच अनुषंघाने यशवंत संघर्ष सेनेच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त यशवंत संघर्ष सेना महाराष्ट्र राज्यच्या वतीने २०२४ चा सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर झाला आहे. सदरील हा पुरस्कार विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हिंगोली येथे दिला जाणार आहे. सामाजिक कृतज्ञता हा पुरस्कार जाहीर होताच सेनगाव तालुक्यातुन सौं वैशालीताई वाघ यांचे अभिनंदन होत आहे,

# अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समावेजना पूर्वी वेतनाची शिक्षण आयुक्तांकडे क्रांतीकारी शिक्षक संघटनेची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



सन-२०२३-२४ च्या संच मान्यतेनुसार ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे अतिरक्त झालेली आहेत त्यांचे इतर शाळेत समावेजनापूर्वी वेतन अदा करणे बाबत शासन निर्णय असतांना अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करत नसल्याने क्रांतीकारी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य सचिव यांनी शिक्षण आयुक्त पुणे, यांच्या कडे निवेदन देण्यात आले असून सदरील कर्मचाऱ्यांचे समावेजनापुर्वी वेतन अदा करण्यात यावे अशी मागणी केली आहे. तसेंच मा.शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक पुणे, यांच्या कडे तक्रार दिली या वेळी संघटनेचे संस्थापक सचिव श्री.शाहेद कादरी, राज्य कार्याध्यक्ष श्री.चव्हाण हनुमंत, पश्चिम महाराष्ट्र विभाग सचिव श्री.सय्यद मुस्तफा, पुणे जिल्हा संघटक श्री.शेख सोफियान यांच्या सह इतर उपस्थित होते.

# सौ.कमलबाई श्रीराम पा.अनेराये यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**



तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथील सौ कमलबाई श्रीराम पाटील अनेराये यांचे अल्पशा आजाराने दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले असून त्यांच्या पश्चात पती,दोन मुले, दोन मुली, सुना नातू असा मोठा परिवार आहे.


कमलबाई श्रीराम पाटील अनेराये ह्या अतिशय नम्रता अंगी असलेल्या आणि प्रमाणिकपणाचे जीवन जगलेल्या आहेत अशी त्यांची गावभर ओळख आहे. दुपारी चार वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आलेल्या वेळी प्रसिद्ध डॉ.माधवराव विभूते, शिवसेनेचे माधव पाटील कल्याण, संजय पाटील चोंडे,पोलीस कर्मचारी साईनाथ सांगवीकर,संगमेश्वर सावकार,गंगाधरराव पांडे, गादेवार सावकार,दिगंबर झुंजारे, सोनालीताई हंबर्डे यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती व्यापारी प्रल्हाद पाटील अनेराये यांची चुलती तर ऑपरेटर माधव अनेराये यांची त्या आई होत.

## जागृत रहा समाज विकासात सहभागी रहा

# प्रयत्न तिथे प्रगती तिथे यश आहे-हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



रोजगार हमी योजना अंतर्गत शेतकऱ्यांना सिंचन विहीर, गाय गोठा, वृक्ष लागवड व या प्रकारच्या अनेक योजना मिळाल्या परंतु लाभ मिळालेल्या शेतकर्यांनी गाय गोठे बांधून काही काळ उलटून गेले परंतु कुशल ,अकुशल चे पैसे लाभार्थ्यांना मिळत नव्हते त्यामुळे लाभार्थी शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकरी,रोजगार त्रस्त झाला होता,

गेली अनेक काळापासून पंचायत समिती स्तरावर प्रस्ताव प्रलंबीत. निष्क्रिय अधिकाऱ्यांच्या वेळकाढू धोरणामुळे खचलेल्या विहिर गाय गोठे,असे अनेक प्रस्ताव काही काळापासून धूळखात पडले असता,या गंभीर प्रकारची दखल घेत आमदार तान्हाजीराव मुटकुळे ह्यांनी कार्याची दखल घेवून पंचायत समिती सेनगाव येथे मग्रारोहयो अंतर्गत ४८२ वैयक्तिक कामाचे कुशल निधी र.४६२.८८ लाख रुपये लाभ धारकाच्या खात्यात वर्ग करण्यात आली असता ही माहिती,भारतीय जनता पार्टी ता. अध्यक्ष हिमंतराव राठोड,गटविकास अधिकारी मार्फत मिळवली आहे,

खरच जो खरा हाडाचा समाज सेवक नेता आहे,तो जागी आहे.परंतु आजची फॅशन आहे.काही लोक खरोखर समाज कार्याच्या कामासाठी प्रामाणिकपणे तळमळीने झटलेल्या नेत्यांची किम्मत तर नाहीच पण त्यांनाच नाव ठेऊन स्वतः मोठे होण्याचे प्रयत्न करतानाच दिसताय.प्रत्यक्ष काहीही काम न करता कार्य करणा-या नेत्यांनाच नाव ठेऊन व समाज कामाला काहीच महत्व न देता आपण प्रत्यक्ष काहीही न करता चांगल्या कार्याला बदनाम करतायत, दुसऱ्यावर शिंतोडे उडवणारे नेते,कार्यकर्ते, ओळखन आजची गरज आहे,

गाव तिथे सुधारणा करणारा नेता ओळखन आज काळाची गरज आहे,समाजा प्रती प्रेम आपुलकी.म्हणुन असणाऱ्या नेत्यांसाठी प्रत्येकाने, प्रभाव शाली नेत्यांसाठी आज रस्त्यावर उतरणाऱ्या प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या नेत्यांसाठी जनतेने सहभागी रहावे. दहा वर्ष घरात बसून दुसऱ्यावर नावबोट ठेवून स्वताच्या जीवनाचा टाईमपास करत असणाऱ्या नेता विश्वासात घेवून.गाव खेड्यातील, वसतीची हेळसांड होईल अश्या नेत्यांना दोन हात लांब करून कार्य तिथे कौतुक करण्याचा प्रयत्न जनतेने जरूर करावा.

## विधानसभेच्या रिंगणात अजित पवार गटाला

# अवघ्या २५ जागा मीळणार असल्याचे खात्रीलायक वृत्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या विषयावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाच्या अंतर्गत बैठकीतुन बातमी समोर आली आहे त्यामध्ये २५. उमेदवार ठरल्याचे समजते २५ उमेदवारांना कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत विषेश बाब म्हणजे अजित पवार हेच बारामती मतदारसंघातून निवडणूक लढविणार असल्याचे समजते अहमदनगर जिल्ह्यातुन एकच उमेदवार ठरल्याचे समजते अहमदनगर शहरातुन विधेमान आमदार संग्राम जगताप यांना तयारीला लागा असे आदेश आल्याचे सांगण्यात येत आहे मीळालेल्या माहितीनुसार २५. संभाव्य उमेदवार पुढिल प्रमाणे बारामती, अजित पवार, उदगीर,संजय बनसोडे, दिंडोरी नरहरी झिरवळ, आंबेगाव दिलीप वळसे पाटील, पुसद, इंद्रनील नाईक , येवला, छगन भुजबळ, परळी, धनंजय मुंडे, पिंपरी, अण्णा बनसोडे, महाबळेश्वर वाई, मकरंद आबा पाटील, इंदापूर दत्ताजी भरणे, कळवण, नितिन पवार, रायगड, अदिती तटकरे, मावळ सुनील शेळके, वडगाव शेरी सुनील टिंगरे, जुन्नर अतुल बेनके,खेड दिलीप मोहिते, कागल हसन मुश्रीफ, अहेरी धर्मरावबाबा अत्राम, प्राप्त संभाव्य यादी मुळे अनेक इच्छुक भावि आमदारांची चांगलीच पंचाईत होणार आहे त्यामुळे अनेक भावि आमदारांच स्वप्न भंग होणार आहे तर काही भावि आमदारांना पक्ष निष्ठा खुटिला टांगुन ठेवत पुन्हा पक्षांतर करावे लागणार आहे विषेश बाब म्हणजे अहमदनगर जिल्ह्यात फक्त एक उमेदवार ठरल्याचे समजते त्यामुळे अनेक मतदारसंघात राजकीय समीकरणे बदलणार आहेत हे मात्र नक्की ,,चौकट श्रीगोंद्याची जागा भाजपा कडुन पाचपुते कुटुंबात फायनल असल्याचे खात्रीलायक वृत्त मिळाले आहे त्यामुळे तालुक्यातील भावि आमदारांची चांगलीच पंचाईत होणार आहे पुन्हा पक्षांतर केले तर मतदार स्विकारणार का त्यामुळे तालुक्यातील अनेक राजकीय समीकरणे बदलणार आहेत

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904